लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : बुधवार – ४ ऑक्टोबर २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १७८
पाने – ४
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

किंमत २ रूपये

लातूर - नाशिक
दररोज
रात्री ८.३० वाजता
GET IT ON Google Play VISHWA TRAVELS APP
विश्व ट्रॅव्हल्स
२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.
संपर्क : (02382) 242790, 254002, 249329, 88888 45403, 88888 45404.
Online Booking : www.vishwatravels.in

# लातूरचे पालकमंत्री म्हणून संजय बनसोडे कोणाला नकोत

**लातूर : आज मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी अकरा जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांची नव्याने नियुक्ती केली आहे. लातूर जिल्ह्यातील असलेले क्रीडामंत्री ना. संजय बनसोडे हे लातूरचे पालकमंत्री होणार असे अपेक्षीत असताना त्यांना परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ना. बनसोडे लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री नकोत असे कोणाला वाटतेय अशी चर्चा जिल्ह्यात चालू आहे.**

अजितदादा पवार गटासह राज्यात तीन इंजीन सरकार आल्यापासून राज्यात पालकमंत्री पदाचे वाद चालू होते. जवळपास दोन महिन्यानंतर मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी अकरा जिल्ह्यासाठी पालकमंत्री घोषीत केले आहे. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील असतानाही उपमुख्यमंत्री ना. अजितदादा हेच पालकमंत्र्याप्रमाणे पुण्यात बैठका घेत होते. सरकारने पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून दादाच ठेवले पण (चंद्रकांतदादा ऐवजी) अजितदादा पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चंद्रकांतदादा पाटील यांना आता अमरावती, सोलापूरचे पालकमंत्री बनविण्यात आले आहे. सोलापूरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना अकोला, दिलीप वळसे-पाटील यांना बुलडाणा, विजयकुमार गावीत-भंडारा, हसन मुश्रीफ कोल्हापूर, धनंजय मुंडे बीड, अनिल पाटील नंदूरबार, सुधीर मुनगंटीवार वर्धा, संजय बनसोडे परभणीचे पालकमंत्री अशी घोषणा करण्यात आली आहे. ना. गिरीश महाजन यांच्याकडे जळगाव, नांदेड, लातूर या तीन जिल्ह्याचे पालकमंत्रीपद आहे. लातूर जिल्ह्यातील संजय बनसोडे यांचा राज्य मंत्रिमंडळात कॅबीनेट मंत्री म्हणून समावेश झाल्यापासून तेच लातूरचे पालकमंत्री होणार अशी अपेक्षा लातूरकरांची असताना ना. बनसोडे यांना लातूरऐवजी परभणी जिल्ह्याचे पालकत्व दिले आहे.




## मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी लातुरात तुफान गर्दी

मराठा आरक्षणाचा प्रश्न लावून धरणारे, मराठा तरूणांच्या मनातील ताईत असलेले, मराठा आरक्षणासाठी लढा देणारे योद्धे मनोज जरांगे पाटील यांचे आज दुपारी २ वाजण्याच्या सुमारास लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात आगमन झाले. त्यांनी महाराजांना अभिवादन केल्यानंतर उघड्या जीपमधून शिवाजी चौकात काही अंतर जात असताना लातुरात तरूणांची प्रचंड गर्दी झाली होती. त्यांच्यावर अनेकांनी पुष्पवृष्टी केली. त्यांचे फोटो काढण्यासाठी शेकडो तरूणांच्या हातातील मोबाईलमधून फ्लॅश होताना दिसत होते. त्यांनी काही वेळ लातूरकरांशी हितगुजही केले. नंतर ते पाखरसांगवी, ता. लातूर येथील जाहीर सभेसाठी रवाना झाले. (फोटो-प्रकाश कंकाळ)




## खा. हेमंत पाटील यांचा लातूरच्या वैद्यकीय शिक्षक संघटनेकडून निषेध

लातूर : हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील यांनी नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता व बालरूग्ण विभागाचे प्रमुख यांच्याशी अरेरावी करून त्यांना शौचालय साफ करण्यास भाग पाडल्याच्या घटनेचा लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

आज वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्या नावे एक निवेदन लातूरचे अधिष्ठाता डॉ. समीर जोशी यांच्यामार्फत दिले आहे. खा. हेमंत पाटील यांच्या या कृतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत शिक्षक व स्टॉफ यांचे खच्चीकरण झाले असून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी, असे म्हटले आहे. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. उमेश कानडे, सचिव डॉ. गणेश बंदखडके व इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# रेणापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना मंत्रालय परिसरातून ताब्यात घेतले

लातूर : मराठवाड्यात नदीजोड प्रकल्प राबवून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यात यावा, या व शेतकर्यांच्या विविध मागण्यांसाठी लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील शेतकर्यांनी किसान सेनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन बोळंगे यांच्या नेतृत्वाखाली रेणापूर ते मुंबई मंत्रालय पायी संघर्ष यात्रा काढण्यात आली. मुंबई येथील मंत्रालयात आज ३ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्र्यांना मंत्रालयालयावर मोर्चाचा इशारा दिला होतो. त्यामुळे किसान सेनेचे गजानन बोळंगे व २० ते २५ आंदोलक शेतकरी मंत्रालयात गेले असता. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान विरोधी पक्षाचे कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या आंदोलकांची भूमिका समजावून घेतली व त्यांचे निवेदन स्विकारले.

ताब्यात घेंतलेल्या गजानन बोळंगे, बाबुराव बडे, व्यंकट बोळंगे, गुरूनाथ बोळंगे ,अच्युतराव करमुडे , कोंडीबा नागरगोजे, राजू नागरगोजे, संतराम चिकटे, प्रमोद चिकटे, गोविंद आवळे, संजय गवरे, पांडुरंग केंचे, ईलाई शेख, गणेश खेडकर, सचिन निकम, बसवेश्वर थोंटे, सुरेंद्र भारती, अशोक आगरकर, बळीराम काळे यांना काही वेळानंतर आझाद मैदानावर उपोषणस्थळी आणून सोडण्यात आले.

तीन ऑक्टोंबर मंत्रालयावर मोर्चा जो इशारा दिला होता किसान सेना व शेतकरी यांनी आज आम्हाला मंत्रालयातून अटक करण्यात आली व त्यानंतर सुटका करून आझाद मैदान येथे उपोषणाठिकाणावर सोडण्यात आले, अशी माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. यामध्ये गजानन बोळंगे, बाबुराव बडे, व्यंकट बोळंगे, गुरुनाथ बोळंगे, अच्युतराव करमुडे, कोंडीबा नागरगोजे, राजू नागरगोजे, संतराम चिकटे, प्रमोद चिकटे, गोविंद




आवळे, संजय गवरे, पांडुरंग केंचे, ईलाई शेख, गणेश खेडकर, सचिन निकम, बसवेश्वर थोंटे, सुरेंद्र भारती अशोक आगरकर, बळीराम काळे आदी शेतकरी आंदोलकांचा सहभाग होता.

## तुळजाभवानी मंदिराच्या गाभाऱ्यात जाण्यास जानकरांना रोखले

तुळजापूर : राष्ट्रीय समाज पक्षाचे सर्वेसर्वा माजीमंत्री आ. महादेव जानकर यांना आज तुळजाभवानी देवीच्या गाभाऱ्यात जाण्यापासून रोखल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

आ. महादेव जानकर यांनी आज जनसुराज्य यात्रेची सुरूवात देवीच्या आरतीने केली. ते देवीच्या गाभाऱ्यात जात असताना सुरक्षा रक्षकांनी त्यांना अडवले. यावरून जानकर व सुरक्षा रक्षक यांच्यात काही काळ वादावादी निर्माण झाली. जानकर यांनी बाहेरूनच देवीचे दर्शन घेतले. मात्र, त्यांनी याबाबत तुळजाभवानी संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्याशी बोलणार असल्याचे म्हटले आहे. महादेव जानकर आले तेंव्हा अभिषेक पुजा संपलेली होती. आरती सुरू होती. आरती सुरू असताना पुजाऱ्याशिवाय गाभाऱ्यात कोणालाही सोडले जात नाही. त्यामुळे जानकर यांना गाभाऱ्यात प्रवेश दिला नाही, असा खुलासा श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानचे व्यवस्थापक तथा तहसीलदार सोमनाथ माळी यांनी केला आहे.



## लातुरात उभ्या दोन रेल्वे बोगी जळून खाक

आज बुधवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हरंगुळ बु. रेल्वे स्टेशन येथे उभ्या असलेल्या दोन शयनयान बोगीस अचानक आग लागली. या आगीत दोन बोगी जळून खाक झाल्याचे सांगण्यात येते. आग कशामुळे लागली, नुकसान किती झाले हे अद्याप समजू शकले नाही.

## ६६ हजाराचा गुटखा जप्त

लातूर : किनगाव येथे एका व्यक्तीकडून अवैध स्वरूपात गुटखा, पानमसाला विक्री केला जात असल्याच्या संशयावरून धाड टाकून त्याच्याकडून सुमारे ६६ हजार रूपयांचा गुटखा जप्त करून त्याच्यावर किनगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद बाबुराव संगनगिरे रा. जढाळा याच्या ताब्यातून ६६ हजार ५३० रूपयांचा गुटखा जप्त केला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाचे विठ्ठल लोंढे यांच्या तक्रारीवरून किनगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आ. गोपीचंद पडळकर दोन दिवस लातूर जिल्हा दौऱ्यावर

लातूर : लातूर जिल्ह्यातील ६ तालुक्यातील २५ गावात आ. गोपीचंद पडळकर हे घोंगडी बैठका घेणार असून अहमदपूर येथे त्यांचे ६ ऑक्टोबर शुक्रवार रोजी सकाळी ९ वा. जंगी स्वागत करण्यात येणार आहे.

अहमदपूर तालुक्यातील शेणकुड, आंधोरी, किनगाव, थोट सावरगाव, चाकूर तालुक्यातील झरी नवकुंड, जानवळ, शिवणखेड, राचन्नावाडी, येणगेवाडी, चापोली, जळकोट तालुक्यातील वांजरवाडा, धनगरवाडी, कोळनुर, लातूर तालुक्यातील टाकळगाव, चिंचोली ब., हरंगुळ, निलंगा तालुक्यातील केळगाव, काटे जवळगा, अंबुलगा, उदगीर तालुक्यातील देवर्जन इ. गावात आ. गोपीचंद पडळकर घोंगडी बैठका घेणार आहेत.

आ. गोपीचंद पडळकर हे ६ व ७ ऑक्टोबर असे दोन दिवस लातूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. घोंगडी बैठकीस आपल्याला सोयीचे असेल त्या त्या ठिकाणी उपस्थित राहून ओबीसींसह सर्व बहुजन समाज व धनगर समाज यांनी या घोंगडी बैठकीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आ. गोपीचंद पडळकर युवा मंच लातूर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे.

### त्यांच्या मते....

**महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव बदलून आता फोन टॅपींग दल ठेवा.**
– नाना पटोले

सरकार विशिष्ट अधिकाऱ्यावर एवढे मेहरबान का? कळत नाही.

**चीन व पाकिस्तानपासून जेवढा धोका या देशाला नाही तेवढा भाजप व आरएसएसपासून आहे.**
– योगेंद्र यादव

काय बोलताय योगेंद्र.

**अजितदादा पवार यांना राजकीय आजार कधीच येत नाही.**
–ना. छगन भुजबळ

त्यांची प्रकृतीच तशी आहे

**या देशात सर्वात जास्त लोकसंख्या गरिबांची आहे. गरीबांचे कल्याण हेच माझे ध्येय**
–पंतप्रधान नरेंद्र मोदी

जातनिहाय जनगणनेस हि बगल आहे का?

## अखेर लातूरला पूर्णवेळ तहसीलदार मिळाला

लातूर : लातूरचे तहसीलदार स्वप्नील पवार यांची बदली झाल्यापासून लातूर तहसीलदार हे पद रिक्त होते. लातूरला लवकरात लवकर पूर्णवेळ तहसीलदार द्यावा, अशी मागणी होत होती. महाराष्ट्र शासनाने एक आदेश काढून लातूरचे तहसीलदार म्हणून सौदागर तांदळे यांची नियुक्ती केली आहे.

लातूर हे जिल्ह्यातील महत्वाचे तहसील कार्यालय आहे. गेल्या काही महिन्यांपासून तहसीदार पदाचा पद्भार जिल्ह्यातील एखाद्या तहसीलदाराकडे अतिरिक्त होता तर बराचवेळा नायब तहसीलदार हेच प्रभारी तहसीलदार म्हणून काम पाहत होते. शासनाने काल लातूरचे तहसीलदार म्हणून सौदागर तांदळे यांचे व लातूर येथून सोलापूर जिल्ह्यात बदली झालेल्या तहसीलदार शोभा पुजारी यांची नाशिक तहसीलचे तहसीलदार म्हणून आदेश काढले आहेत. लातूर येथून मोहोळ, जि. सोलापूर येथे शोभा पुजारी यांची बदली झाली होती. पण, या पदावर त्यांना गेली काही दिवस रूजूच होता आले नाही. कालच्या आदेशात दोन तहसीलदारांच्या नव्याने नियुक्तीचे आदेश शासनाने काढले आहेत. लातूरला तहसीलदार म्हणून नियुक्ती केलेले सौदागर तांदळे हे यापुर्वी तुळजापूरला होते. त्याही अगोदर त्यांनी लातूर, निलंगा येथेही काम केलेले आहे. एक अनुभवी व लोकाभिमूख तहसीलदार म्हणून सौदागर तांदळे यांचा नावलौकीक आहे.




## मराठा कार्यकर्त्यांकडून शहर बसला दे धक्का

आज दुपारी लातूरच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात गोलाई खंडापूर गोलाई एम एच २४ एक्यू १४८७ या क्रमांकाची सिटी बस बंद पडली. चालक वाहकाने बराच वेळ प्रयत्न करून पण सिटी बस चालू झालीच नसल्याने चौकात वाहणाची गर्दी झाली.मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी चौकात जमा झालेल्या मराठा कार्यकर्त्यांनी बसला धक्का देऊन रोडच्या कडेला उभा केली.

# यंदाही दिवाळीला मिळणार 'आनंदाचा शिधा'



मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात राज्य मंत्रिमंडळाची बैठक काही वेळापूर्वी पार पडली. या बैठकीत मंत्रिमंडळाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक पार पडल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली आणि मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती दिली. मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की यंदाही दिवाळीत राज्यातल्या नागरिकांना १०० रुपयांमध्ये आनंदाचा शिधा दिला जाईल. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयाने राज्यातील नागरिकांना ही गोड बातमी दिली आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीला आनंदाचा शिधा मिळणार असून यामध्ये दोन नवीन जिन्नसांचा समावेश करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, दिवाळीनिमित्त राज्यातील शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. या शिध्यात आता मैदा आणि पोह्याचाही समावेश करण्यात आला आहे. पूर्वी 'आनंदाचा शिधा' या संचात रवा, चनाडाळ, साखर आणि खाद्यतेल असे ४ जिन्नस होते. मात्र आता यामध्ये दोन जिन्नसांची भर पडली आहे. राज्यातील अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्हे त्याचबरोबर नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील केशरी शिधापत्रिका असलेल्या नागरिकांना, शेतक-यांना अशा १ कोटी ६६ लाख ७१ हजार ४८० शिधापत्रिकाधारकांना हा आनंदाचा शिधा मिळेल.

'आनंदाचा शिधा' या संचात १ किलो साखर, १ लिटर खाद्यतेल तसेच प्रत्येकी अर्धा किलो रवा, चनाडाळ, मैदा आणि पोहे असा शिधा दिला जाईल. हा आनंदाचा शिधा २५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत वितरित करण्यात येईल. यासाठी येणा-या एकूण ५३० कोटी १९ लाख इतक्या खर्चासदेखील आजच्या कॅबिनेट बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.




# तुमच्या फोनमध्ये ताबडतोब करा ही सेटिंग, भूकंपाच्या आधी तुम्हाला मिळेल अलर्ट

दिल्ली : एनसीआरमध्ये आज भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. भूकंपाचे केंद्र नेपाळ असल्याचे बोलले जात आहे. गाझियाबाद, गुरुग्राम, नोएडा, फरिदाबाद या शहरांसह दिल्लीतील लोक जीव वाचवण्यासाठी इमारतीबाहेर आले. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ६.२ इतकी होती. पण जर तुम्हाला भूकंप येण्याआधीच इशारा मिळाला तर? तुमच्या माहितीसाठी, आम्ही तुम्हाला सांगतो की Google Android फोनवर भूकंपाचे अलर्ट पाठवते. नुकतेच, अमेरिकन कंपनीने भारतात भूकंप इशारा प्रणालीची चाचणी देखील घेतली आहे.

गुगलची नवीन प्रणाली सुरू झाल्यानंतर स्मार्टफोनवर भूकंपाचा इशारा मिळणार आहे. यामुळे तुम्हाला तुमचा जीव भूकंपापासून वाचवण्याची संधी मिळते आणि तुम्ही आवश्यक पावले उचलू शकता. सध्या भारतात या प्रणालीची चाचणी सुरू आहे. तुम्हालाही तुमच्या फोनवर भूकंपाचा इशारा हवा असेल, तर तुम्हाला काही सेटिंग्ज कराव्या लागतील. यानंतर तुमच्या फोनवर भूकंपाचा इशाराही दिसू शकतो.

अँड्रॉइड भूकंप सूचना प्रणाली अनेक देशांमध्ये आधीच कार्यरत आहे. या देशांमध्ये भूकंप येण्यापूर्वीच इशारा दिला जातो. ही प्रणाली भारतात आणण्यासाठी Google राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) आणि राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्र (NSC) यांच्याशी बोलत आहे. लवकरच भारतातही अलर्ट मिळण्यास सुरुवात होईल.

Google ची अलर्ट सिस्टम तुमच्या फोनचे सेन्सर वापरते. हे सिस्मोग्राफ म्हणून फोनच्या एक्सेलेरोमीटरचा वापर करते. अशा प्रकारे तुमचा फोन एक छोटा भूकंप शोधक बनतो.

तुमच्या फोनमध्ये Google कडून भूकंपाचे अलर्ट मिळवण्यासाठी करा या सेटिंग्ज

तुमच्या Android स्मार्टफोनच्या सेटिंग्जवर जा.

येथे स्थान पर्याय निवडा.

आता भूकंपाच्या सूचनांवर जा.

या पर्यायावर एक टॉगल असेल, तो चालू करा.

यानंतर, तुम्हाला तुमच्या फोनवरही भूकंपाचे अलर्ट मिळू लागतील.

लक्षात ठेवा की Google चे अलर्ट सिस्टम अद्याप चाचणी टप्प्यात आहे. Google फक्त ४.५ किंवा त्याहून अधिक तीव्रतेच्या भूकंपासाठी अलर्ट पाठवते. अशी काही ठिकाणे आहेत, जिथे ही यंत्रणा काम करत नाही.

# भारतात अन्नाची नासाडी



अन्नाच्या नासाडीचा थेट परिणाम अन्नधान्य उत्पादक शेतकरी, अन्नधान्य विकणारे किरकोळ विक्रेते आणि ग्राहकांवर होतो. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण नुसार, एक तृतीयांश अन्न खाण्यापूर्वी खराब होते किंवा वाया जाते. ताटात न शिंपडण्याची प्रथा वर्षानुवर्षे सुरू आहे. आश्रमशाळांमध्ये विद्यार्थी ताटात एक कणही सांडत नाहीत. अरेरे, खाल्लेल्या ताटात पाणी ओतले जाते आणि ते हलवून प्यायले जाते जेणेकरून ताटात अन्नाचा एकही अवशेष शिल्लक राहू नये. हा दृष्टिकोन शहरातील वसतिगृहांमध्ये आढळत नाही. जेवणात बुफे पद्धत सुरू झाल्यापासून लोक जास्त अन्न वाया घालवतात.

अलीकडेच जी-२० देशांची दिल्लीत बैठक झाली तेव्हा अन्न उत्पादन आणि जागतिक भूक या मुद्द्यावर चर्चा झाली. शासकीय गोदामांमध्ये अनेक वेळा धान्य सडण्याचे किंवा किडींचा प्रादुर्भाव झालेला असतो. कधीकधी उंदीर ते खराब करतात. अन्नाचा अपव्यय ही जागतिक समस्या बनली आहे. एकीकडे अन्न आणि विपणन तंत्रज्ञान विकसित झाले असले तरी अन्न वाया जाण्याच्या प्रमाणात फारसा बदल झालेला नाही. मानवजातीसाठी उगवलेले सुमारे १.३ अब्ज मेट्रिक टन अन्न एकतर फेकले जाते, वाया जाते किंवा खराब होते. अन्नाच्या नासाडीचा पर्यावरणावरही गंभीर परिणाम होतो. अन्न कचर्याचे विघटन केल्यास हानिकारक मिथेन वायू तयार होतो. अन्न तयार करण्यासाठी वापरलेले पाणी, खत आणि जमीन देखील कायमस्वरूपी नुकसानीत मोजली जाते.

अन्नाच्या नासाडीचा थेट परिणाम अन्नधान्य उत्पादक शेतकरी, अन्नधान्य विकणारे किरकोळ विक्रेते आणि ग्राहकांवर होतो. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण नुसार, एक तृतीयांश अन्न खाण्यापूर्वी खराब होते किंवा वाया जाते. ताटात न शिंपडण्याची प्रथा वर्षानुवर्षे सुरू आहे. आश्रमशाळांमध्ये विद्यार्थी ताटात एक कणही सांडत नाहीत. अरेरे, खाल्लेल्या ताटात पाणी ओतले जाते आणि ते हलवून प्यायले जाते जेणेकरून ताटात अन्नाचा एकही अवशेष शिल्लक राहू नये. हा दृष्टिकोन शहरातील वसतिगृहांमध्ये आढळत नाही. जेवणात बुफे पद्धत सुरू झाल्यापासून लोक जास्त अन्न वाया घालवतात.

जगातील ८०० दशलक्ष लोक उपासमारीने त्रस्त असताना अन्नाची नासाडी ही लाजिरवाणी गोष्ट आहे. काही सेवाभावी संस्था जनजागृतीसाठी प्रयत्न करतात, मात्र अपेक्षित सुधारणा होताना दिसत नाही. २०२१ च्या अन्न कचरा निर्देशांकावर नजर टाकल्यास, भारतात दरवर्षी प्रति व्यक्ती सुमारे ५० किलो अन्नधान्य वाया जाते.हे दुर्दैवी आहे.एकीकडे लाखो लोक उपासमारीने हलाखीचे जीवन जगत आहेत, तर दुसरीकडे अन्नाची नासाडी होत आहे. उभी पिके पक्षी खाऊ नयेत म्हणून चड्या शेतात ठेवल्या जातात. समाजजीवनातही अशी भीती अन्न सांडणार्या लोकांमध्ये निर्माण व्हायला हवी! अन्न प्रक्रिया करतानाही काही कचरा जनावरांना खाण्याऐवजी फेकून दिला जातो.

जेव्हा बरेच लोक मोठ्या हॉटेलमध्ये जातात तेव्हा गटातील प्रत्येकजण यादृच्छिकपणे त्यांना आवडेल ते ऑर्डर करतो. जेवण झाल्यावर सुरुवातीला सगळे पटकन जेवायला लागतात, पण थोड्या वेळाने भूक भागते आणि उरलेले अन्न मागे राहते. काही हॉटेलवाले ग्राहकांच्या विनंतीला मान देण्यासाठी अतिरिक्त खाद्यपदार्थ पॅक करतात.बरेच लोक हे उरलेले अन्न रस्त्यावरील भिकार्यांना किंवा परराज्यातील कामगारांच्या मुलांना देतात. बरेच लोक वंदेभारत किंवा शताब्दी सारख्या गाड्यांमध्ये प्रवाशांना दिलेले जेवणाचे ताट पॅक करतात आणि योग्यता मिळविण्यासाठी बाहेर बसलेल्या भिकार्यांना देतात. येथे अन्नाची नासाडी न करणे आणि भुकेल्यांना अन्न देणे हा हेतू आहे.पुण्य मिळविण्यासाठी हा दृष्टिकोन स्वागतार्ह आहे.

ताटात पुरेसे अन्नच घेतले पाहिजे. अन्यथा नासाडी होईल आणि अन्नाची नासाडी कोणत्याही देशाला परवडणार नाही. अन्नाची किंमत समजून घेणे हे मूलभूत शिक्षणात समाविष्ट केले पाहिजे. लग्नसमारंभात, लोक ताट ओव्हरफ्लो करणारे पदार्थ घेतात आणि नंतर ते कचर्यात फेकतात.सुसंस्कृत समाजाचे दुर्दैव हे आहे की जेवढे खावे तेवढे घ्या असे सांगणारे कोणी नाही. काही समारंभांमध्ये, सेवाभावी संस्थांचे कार्यकर्ते वाढलेले अन्न घेतात आणि ते भुकेल्या लोकांना किंवा भुकेल्या प्राण्यांना खाऊ घालतात.ताटात अन्न सोडून उठून जाणे, हे असभ्यतेचे लक्षण आहे.हे सांगण्यासाठी व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे.

**-रवींद्रकुमार जाधव**
**सामाजिक विश्लेषक**

# नवरात्र महोत्सवात आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती

धाराशिव, दि. ३ : धाराशिव जिल्ह्यात श्री क्षेत्र तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी देवीची शारदीय नवरात्र महोत्सव यात्रा दि .०६ ते ३० ऑक्टोंबर २०२३ या कालावधीत मोठया प्रमाणात यात्रा भरणार आहे. यात्रे मध्ये यात्रेकरुंना आरोग्य विभाग जिल्हा परिषद धाराशिव यांचेमार्फत उपचारात्मक व प्रतिबंधात्मक सेवा देण्यात येत आहे. यात्रा कालावधीत तात्काळ आरोग्य सेवा देण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय, तुळजापूर येथे अधिकारी, कर्मचारी, व रुग्णवाहिका संदर्भीय आरोग्य सेवा देण्यासाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

वरील कालावधीत तुळजापूर शहरात एकुण २१ ठिकाणी प्रथमोपचार केंद्र ठेवण्यात आलेली आहेत. तसेच तीन १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात आलेल्या असून या प्रथोमोपचार केंद्रात पुरेश्या प्रमाणात औषधीसाठा उपलब्ध केलेला आहे. तरी प्रथमोपचार केंद्रात यात्रेकरूना आरोग्यसेवा देण्यात येणार आहे.

वरील कालावधीत श्री क्षेत्र तुळजापूर येथे पायी येणाऱ्या यात्रेकरुंसाठी ग्रामीण भागात १९ ठिकाणी प्रथोमचार केंद्र चालु करण्यात आलेली आहेत. यात्रा मार्गावर वडगाव, पाटोदा मोड, आष्टामोड, माकणी, तामलवाडी, कसई, माळूम्ब्रा, बोरी, तीर्थ (बु),देवसिंगा, ताकविकी, कांक्रंबा, तुरोरी, येणेगुर, तलमोड, नळदुर्ग, जळकोट,लोहारा, नारंगवाडी या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरू केलेले आहे.

शहरात उपाययोजनेसाठी १० आरोग्य पथके तयार केलेली असून या पथकास गल्ली, वार्डाचे वाटप करून या भागातील सर्व पाणी साठ्याचे हॉटेल, धाबे, खाणावळ येथील पाण्याचे निर्जंतुकीकरण करून पाणी शुद्धीकरण झाल्याची खात्री ओ.टी.टेस्ट घेऊन करण्यात येते. ओ.टी. टेस्ट निगेटीव्ह आल्यास मदर सोल्युशन किंवा मेडीक्लोर द्वारे पाणी साठ्याचे निर्जंतुकीकरण करण्यात येते.

तरी यात्रेकरूनी वरील आरोग्य सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव, डॉ. एस. एल. हरिदास, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव व डॉ.इस्माईल मुल्ला, जिल्हा शल्यचिकीत्सक, धाराशिव यांचे मार्फत करणात आलेले आहे.(डॉ. एस. एल. हरिदास) जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव.

# सरकारला मराठवाडा दुष्काळ जाहीर करण्यास भाग पाडून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देईन-शेट्टी

धाराशिव : मराठवाड्यामध्ये यंदा अत्यल्प पाऊस असल्यामुळे सर्व पिके वाया गेले आहेत. तर पाणी नसल्यामुळे जल स्त्रोत देखील आटलेले आहेत. त्यामुळे शेतकरी हतबल झाला असून सरकार दरबारी आवाज उठवून मराठवाड्याला दुष्काळ जाहीर करण्यास भाग पाडू असे आश्वासन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना दि.२९ सप्टेंबर रोजी दिले.



धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळी पाहणी करण्यासाठी ते आले होते. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांची विचारपूस करीत संवाद साधला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सांगली जिल्हाध्यक्ष तथा पंचायत समिती सदस्य संदीप राजोबा, धाराशिव जिल्हाध्यक्ष रवींद्र इंगळे, उपाध्यक्ष धनाजी पेंदे, जिल्हा संपर्कप्रमुख शहाजी सोमवंशी, राजाभाऊ हाके, तालुकाध्यक्ष दुर्वास भोजने, तालुका पक्षाध्यक्ष नेताजी जमदाडे, विजय शिरसट, संतोष भोजने, बाळासाहेब मडके, रत्नेश घाटे, नेपते आबा, आदिनाथ काळे आदी उपस्थित होते. राजु शेट्टी यांनी धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, धाराशिव, कळंब तालुक्यात विविध ठिकाणी बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली व तसेच मराठवाड्यामध्ये सध्या दुष्काळाची जी परिस्थिती उद्भवली आहे. त्या परिस्थितीची दाहकता किती मोठ्या प्रमाणात आहे ? हे सरकार दरबारी मांडण्याचे काम करणार आहेत. तसेच येणाऱ्या काळात सरकारला नक्कीच मरावाडा दुष्काळ जाहीर करण्यास भाग पाडून वंचित, गोरगरीब शेतकरी यांना न्याय मिळवून देण्याचे काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच अग्रीम विमा मंजूर होऊन सुद्धा देखील अद्यापपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये कोणत्याही प्रकारचा निधी जमा झालेला नाही. त्यामुळे ती अग्रीम रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. ती रक्कम जमा न केल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करील असा इशाराही त्यांनी दिला. आगामी काळात होणाऱ्या नगरपरिषद पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुका स्वाभिमानी शेतकरी संघटना लढविणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, कळंब कृषी उत्पन्न समितीच्या सर्वसाधारण वार्षिक बैठकीस उपस्थित राहून शेतकरी व व्यापारी यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर ते बीड जिल्ह्यातील केज येथील मराठवाडा दुष्काळ आक्रोश मेळावा सभेसाठी रवाना झाले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुमची सोशल मीडिया पत आणि बँक कर्ज

बँका आणि वित्तीय संस्था कर्ज देताना कर्जदाराची बरीच चौकशी करत असतात. अशी चौकशी करत असताना पारंपरिक मार्ग आत्तापर्यंत वापरले जात होते. जसे की कर्जदाराच्या घरी भेट देणे, कर्जदाराच्या व्यवसायाच्या ठिकाणी भेट देणे, कर्जदाराच्या काही जमीनदारांकडे चौकशी करणे या पारंपरिक चौकशी व्यतिरिक्त आता बँका सोशल मीडियावरती तुमचे जे काही वेगवेगळे अकाऊंट आहे, त्यावर जाऊनसुद्धा कर्जदाराची मानसिकता काय आहे, कर्जदाराची सोशल स्टेटस काय आहे, यावरूनसुद्धा तुमचा क्रेडिट स्कोअर ठरवला जातो.

माझ्या एका मित्राच्या मुलाचे जमलेले लग्न मोडले, याबाबत अधिक चौकशी केली असता असे समजले की त्या मुलाचे सोशल मीडिया अकाऊंट चेक केले गेले. तो फार वेळ सोशल मीडियावर घालवतो, तो काही ठराविक एका मुलीच्या पोस्टला सतत उत्तर देतो व त्यावरून काही अंदाज बांधले गेले. मध्ये एक सोशल मीडियावर जोक आला होता की लग्न जमविताना मुलांच्या कुंडली बघण्यापेक्षा त्यांचे सोशल मीडिया अकाऊंट चेक करा. असे हे तुमचे सोशल मीडिया अकाऊंट तुम्हाला कर्ज देतानासुद्धा चेक केले जाते. बँका आणि वित्तीय संस्था कर्ज देताना कर्जदाराची बरीच चौकशी करत असतात.

अशी चौकशी करत असताना पारंपरिक मार्ग आत्तापर्यंत वापरले जात होते. जसे की कर्जदाराच्या घरी भेट देणे, कर्जदाराच्या व्यवसायाच्या ठिकाणी भेट देणे, कर्जदाराच्या काही जमीनदारांकडे चौकशी करणे या पारंपरिक चौकशी व्यतिरिक्त आता बँका सोशल मीडियावरती तुमचे जे काही वेगवेगळे अकाऊंट आहे, त्यावर जाऊनसुद्धा कर्जदाराची मानसिकता काय आहे, कर्जदाराची सोशल स्टेटस काय आहे, यावरूनसुद्धा तुमचा क्रेडिट स्कोअर ठरवला जातो.

माझे एक डॉक्टर क्लाईंट आहे. त्यांनी एक पर्सनल लोनला अर्ज केला होता आणि त्यांचा सीबील स्कोअर हा बर्यापैकी होता, परंतु तरीही त्यांचा पर्सनल लोन अर्ज नामंजूर झाला.



याचे कारण काय असू शकते याची चौकशी करण्यासाठी आम्ही दोघेही एका बँकेच्या कर्ज अधिकार्याकडे गेलो, तर आम्हाला अशी धक्कादायक माहिती मिळाली की सदर डॉक्टरांचे सोशल मीडिया स्कोअर फार कमी आहे. आता ही सोशल मीडिया स्कोअर आणि तुमचे बँक लोन याचा काय संबंध आहे ही माहिती करून देण्यासाठी आजच्या लेखाचा उद्देश आहे. जे काही व्यावसायिक किंवा नोकरदार आहे ते पर्सनल लोन घेतात किंवा कुठलीही व्यक्ती पर्सनल लोन घेते त्यावेळेस सदर लोन ऑफिसर त्याच्या सोशल मीडियावरती जाऊन त्याने केलेल्या सोशल मीडिया पोस्ट व इतर गोष्टी चेक केल्या जातात व त्यावरून सदर व्यक्तीला कर्ज द्यायचे की नाही हे ठरवले जाते.

आता तुम्ही म्हणाल की आमच्या सिबिल स्कोअर ही भरपूर आहे, तरी हे सोशल मीडिया स्कोअर काय प्रकार आहे. जे काही कर्जदार आहेत किंवा इतर कुठले लोक आहेत ज्यांना पर्सनल लोन दिले जाते, त्यांचे सीबील स्कोअर उत्पन्नाचे कागदपत्र त्यांच्या व्यवसायाची माहिती याच्याबरोबर त्यांची सोशल मीडियावर काय ॲक्टिव्हिटी आहे हेसुद्धा चेक केले जाते. त्यावरून आम्हाला सदर कर्जदाराची मानसिकता काय आहे याचा अंदाज बांधता येतो. हे करण्यासाठी बँक तुमचे जे काही सोशल मीडिया अकाऊंट आहे जसे की फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, लिंकडीन यावरती बँक तुमची चौकशी करते. तसेच गुगल सर्च करूनसुद्धा तुमची माहिती काढली जाते. जसे मी वर सांगितले की इतर सर्व ठीक आहे. तुमच्या सिबिल स्कोअर चांगला आहे. तरीही बँक हा सोशल मीडिया स्कोअर हा कशासाठी वापरते हेसुद्धा महिती करून घेणे गरजेचे आहे. बँका तुमच्या सोशल मीडियावर खालील माहिती घेत असतात.

१. तुम्ही किती खर्चिक आहात : आपण कुठेही फिरायला गेलो, काही नवीन वस्तू खरेदी केली, कार खरेदी केली, कुटुंबातील व्यक्तीचे वाढदिवस साजरे केले, मित्रांचे वाढदिवस साजरे केले, तर आपण ते लगेच सोशल मीडियावर फोटो व माहिती टाकतो. अशा पोस्टमधून बँका अंदाज करतात की तुमची पैसे खर्च करण्याची मानसिकता कशी आहे. वारंवार फिरायला जाणे, सतत नवीन वस्तू घेणे यातून तुमच्या खर्चाची मानसिकता तपासली जाते. त्यातून तुमचा कर्ज परतफेडीचा कल कसा असू शकेल, याचा अंदाज केला जातो.

२. दुसरे सर्वात महत्त्वाचे तुम्ही बँकेला कर्ज घेण्यासाठी जो अर्ज करता त्यामध्ये तुमच्या व्यवसायाची किंवा नोकरीची माहिती तुमचा व्यवसायाचा किंवा नोकरीचा पत्ता व तुमचा घरचा पत्ता हा तुमच्या सोशल मीडियावरील पत्ता सोबत जुळत आहे का हेसुद्धा चेक केले जाते आणि जर तो जुळत नसेल, तर तुम्ही खोटी माहिती बँकेला देता त्यामुळे तुमचे नेचर कसे आहे याचा अंदाज बँक लावते.

३. तुमचे सोशल मीडियावर अकाऊंट किती दिवसापासून आहे ही माहिती तुम्हाला कर्ज द्यायचे की नाही यासाठी वापरली जाते. तसेच तुम्ही सोशल मीडियावरती काय पोस्ट करता, त्याला तुमचे मित्र किंवा इतर लोक काय प्रतिक्रिया देतात, तुमचे फॉलोवर किती आहे, हेसुद्धा बघून तुमची पत निश्र्चिती केली जाते. तुम्ही सतत काही वादग्रस्त पोस्ट टाकत असता काय, यावरूनही काही अंदाज लावले जातात.

४. तुम्ही सोशल मीडियावर किती ॲक्टिव्ह आहे, तुम्ही सोशल मीडियावर किती वेळ घालवतात यावरून तुम्ही तुमचा कामात व्यस्त आहे की रिकामटेकडे आहेत व त्यावरून तुमचे उत्पन्न किती असू शकते याचाही अंदाज लावला जातो.

५. तुम्ही व्यावसायिक असाल, तर तुमचा व्यवसाय वृद्धीसाठी तुम्ही तुमचा सोशल मीडियाचा वापर करता की नाही, का फक्त त्यावर टाईमपास करता, यावरूनही काही अंदाज बांधले जातात.

६. तुम्ही एखाद्या सोशल संस्थेबरोबर जोडले गेले आहात का नाही हेसुद्धा तुमच्या सोशल मीडिया पोस्टद्वारे बघितले जाते.

७. तुमचे सोशल मीडियावर किती मित्र आहेत, ते कुठल्या कॅटेगरीचे आहेत, तुमच्या एखाद्या पोस्टला त्यांचा प्रतिसाद कसा आहे हेसुद्धा बघितले जाते.

८. तुम्ही एखाद्या राजकीय पक्षाशी संबंधित आहेत का किंवा त्याचे पदाधिकारी आहेत का यावरूनसुद्धा तुमचा सोशल मीडिया स्कोअर काढला जातो. बर्याच बँका आणि वित्तीय संस्था राजकारणी, वकील व पोलीस विभागातील लोकांना कर्ज देत नाही.

या सोशल मीडियाचा किंवा सोशल स्कोअरचा वापर पाच सी चेक करण्यासाठी केला जातो. त्याच्या मधला पहिला सी आहे ते तुमचे कॅरेक्टर, दुसरा जो सी आहे ते तुमची लोन परत करण्याची कॅपॅसिटी, तिसरा जो सी आहे तो कोलॅटरल सिक्युरिटी काय देऊ शकतात, तुम्ही आतापर्यंत काय काय इन्व्हेस्टमेंट केली आहे त्यासंदर्भात आहे. चौथा जो सी आहे तो म्हणजे तुम्हाला कर्ज देताना काय काय कंडिशन (अटी) टाकायचा. तर या पाच सी वरती तुमचा सोशल मीडिया स्कोअर चेक केला जातो. सुरुवातीला सर्वांना हे नवीन वाटते, परंतु आता बँका तुमच्या सोशल मीडियावरती किंवा गुगलवरती तुमच्याबद्दल माहिती घेऊन तुम्हाला लोन द्यायचे की नाही हे ठरवत आहेत. याबाबत रिझर्व्ह बँकेचे कुठलेही सर्क्युलर किंवा आदेश नाहीत, परंतु कर्जदाराची पत ठरविताना काय काय बघावे हे त्या त्या वित्तीय संस्थेवर अवलंबून आहे.

सर्वच बँका आणि वित्तीय संस्था आता डिजिटल लेडिंगकडे वळत आहेत आणि आरबीआयनेसुद्धा याला मान्यता दिलेली आहे. तुमचे सोशल मीडिया अकाऊंट चेक करताना बँका एआयचासुद्धा चेक करतात. ज्याद्वारे तुमचा मेल आय डी आणि मोबाईल नंबर वापरून तुमच्या सोशल मीडियाबाबत माहिती घेतली जाते व त्यावरून एक रिपोर्ट तयार केला जातो. त्यामुळे तुम्ही पगारदार असाल किंवा व्यावसायिक असाल, तर तुम्ही सोशल मीडियावर काय टाकता, काय पोष्ट शेअर करता याची काळजी घेणे जरुरी आहे. आता तरी बँक व वित्तीय संस्था या विनातारण कर्जासाठी सोशल मीडिया स्कोअरचा वापर करत आहेत. पर्सनल लोन व विनातारण लोन घेणार्यांचीसुद्धा संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. त्यावरून आपल्या सोशल मीडियावर आपण काय शेअर करतो, काय पोस्ट टाकतो यासाठी व्यावसायिकांनी सजग राहावे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## मधुमेहाच्या रुग्णांची वाढणार नाही साखरेची पातळी, लक्षात ठेवा या गोष्टी




मधुमेहाच्या रुग्णांनी दैनंदिन जीवनात काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. जर त्यांनी असे केले नाही, तर त्यांच्या शरीरातील साखरेची पातळी वाढू शकते, ज्यामुळे खूप त्रास होऊ शकतो. अशा परिस्थितीत मधुमेही रुग्णांनी काही गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे. हा आजार होण्याचा धोका कमी करण्यासाठी कोणत्या टिप्स पाळल्या पाहिजेत, ते जाणून घेऊया. डॉक्टरांच्या मते, मधुमेही रुग्णांना त्यांच्या आहाराची आणि जीवनशैलीची विशेष काळजी घ्यावी लागते. या रुग्णांनी साखर, मिठाई आणि प्रक्रिया केलेले पदार्थ खाऊ कोणतेही औषध घेऊ नये किंवा औषधांचा कोर्स बदलू नये असा सल्ला दिला जातो.

याबाबत तज्ज्ञ सांगतात की मधुमेहाच्या रुग्णांनी त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी, रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल दररोज तपासले पाहिजे. आहारात जास्त चरबी घेऊ नयेत, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. याशिवाय मांस, मासे, दूध यांचेही सेवन मर्यादित प्रमाणात करावे लागते. यासोबतच तुम्ही रोज चालणे किंवा हलका व्यायाम यासारखे नियमित केले पाहिजे. रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधे घ्यावीत आणि स्वत:हून नये. मधुमेहाच्या रुग्णांनी दररोज व्यायामासाठी किमान १५ मिनिटे वेळ काढला पाहिजे. नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. जरी प्रत्येक रुग्णाची मधुमेहाची स्थिती आणि गरजा भिन्न असल्या तरी, या काही टिप्स आहेत ज्या प्रत्येकाने पाळल्या पाहिजेत. यामुळे मधुमेह होण्याचा धोका कमी होऊ शकतो.

डायबिटीज टाईप १ आणि टाईप २ असे दोन प्रकार असल्याचे तज्ज्ञ स्पष्ट करतात. यातील प्रकार १ अनुवांशिक कारणांमुळे होतो. टाइप २ मधुमेह हा खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे होतो. गेल्या पाच वर्षांत मधुमेहाच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. भारतातील सर्व राज्यांमध्ये या आजाराची व्याप्ती वाढत आहे. प्री-डायबेटिसच्या रुग्णांमध्येही वाढ होत आहे, ही चिंतेची बाब आहे. अशा परिस्थितीत येत्या ५ वर्षांत मधुमेहाच्या रुग्णांची संख्या अनेक पटींनी वाढण्याची भीती आहे.

तज्ज्ञ सांगतात की, ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात मधुमेहाचे प्रमाण अधिक आहे. याचे मुख्य कारण म्हणजे लोक त्यांच्या आहाराकडे लक्ष देत नाहीत. नियमित व्यायाम देखील करू नका. या दोन कारणांमुळे मधुमेहाच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत लोकांनी अधिक सावध राहण्याची गरज आहे.

## आता अभिमानाने दाखवा तुमची बत्तीशी, हे ५ आयुर्वेदिक उपाय करतील दातांचा पिवळेपणा




पिवळे दात किंवा काळे दात कधी कधी कोणाशी बोलत असताना किंवा दुसऱ्या व्यक्तीसमोर हसताना आपल्याला लाज वाटते. दात पिवळे होणे ही एक सामान्य समस्या आहे, जी लाखो लोकांना प्रभावित करते. मिठाईचे सेवन आणि दातांची योग्य काळजी न घेणे यासह अनेक कारणांमुळे दात पिवळे होतात. रोज खाल्ल्या जाणाऱ्या गोष्टींचे कण दातांवर साचत राहतात त्यामुळे दातांवर प्लेक तयार होतो आणि हेच दात पिवळे होण्याचे सर्वात मोठे कारण आहे.

दात पिवळे पडण्याची अनेक कारणे आहेत ज्यात तंबाखूचे सेवन, कॉफी आणि चहाचे अतिसेवन, धुम्रपान, तोंडाची स्वच्छता, मुलामा चढवणारे रोग, कोणत्याही अंतर्गत आजारासाठी औषध, वाढणारे वय इ. पिवळे दात पांढरे करण्यासाठी तुम्ही दंतवैद्याकडे जाऊ शकता, परंतु तुमचे पिवळे दात मोत्यासारखे चमकण्यासाठी तुम्ही घरच्या घरी काही आयुर्वेदिक उपाय देखील करून पाहू शकता.

**तुळशीची पाने आणि वाळलेल्या संत्र्याची साले**

७ तुळशीची पाने घेऊन ती ठेचून बारीक पेस्ट बनवा.

काही प्रमाणात वाळलेल्या संत्र्याची साले घ्या आणि त्यांची पातळ पावडर बनवा.

वर नमूद केलेल्या दोन्ही चरणांचे अनुसरण केल्यानंतर. दोन्ही साहित्य एकत्र करून बारीक पेस्ट बनवा

ही पेस्ट थेट दातांवर लावा आणि २० मिनिटे तशीच राहू द्या आणि नंतर सामान्य पाण्याने तोंड धुवा.

पांढऱ्या दातांसाठी या घरगुती उपायाचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत, त्यामुळे हा उपाय दिवसातून किंवा आठवड्यातून अनेक वेळा करू शकतो.

**बेकिंग सोडा आणि पाणी**

२ चमचे बेकिंग सोडा किंवा कुकिंग सोडा घ्या आणि त्यात पाण्यात मिसळून घट्ट पेस्ट बनवा.
ही पेस्ट दातांवर लावा आणि ५ मिनिटे तशीच राहू द्या.
ही पेस्ट आपल्या दातांवर लावल्यानंतर, आपले तोंड पाण्याने स्वच्छ धुवा आणि पाणी तोंडात फिरवा.
रोज रात्री झोपण्यापूर्वी पांढऱ्या दातांसाठी हा घरगुती उपाय करा.
मीठ आणि लिंबाचा रस
एक चमचा मीठ घ्या आणि लिंबाचा रस वापरून मीठाची घट्ट पेस्ट बनवा.
या पेस्टने दात घासून घ्या.
पांढऱ्या दातांसाठी हा घरगुती उपाय नियमित किंवा पर्यायाने वापरून पाहू शकतो.
ब्रश करताना हिरड्यांची काळजी घ्या.

**लाकडी कोळसा**

कोळशाचे काही तुकडे किंवा कॅप्सूल घ्या आणि त्यांची पावडर करा.
तुमचा टूथब्रश पाण्याने ओला करा आणि त्यावर काही प्रमाणात कोळशाची पावडर शिंपडा.
दिवसातून दोनदा हे घरगुती उपाय करा. कोळशाने घासणे हे पांढऱ्या दातांसाठी सर्वोत्तम घरगुती उपाय आहे.
ॲपल सायडर व्हिनेगर आणि गरम पाणी
दोन चमचे ॲपल सायडर व्हिनेगर घ्या आणि ते एका ग्लास कोमट पाण्यात मिसळा.
या पाण्याने गार्गल करा आणि तोंडात फिरवा.
पांढरे दातांसाठी हा घरगुती उपाय आठवड्यातून एक किंवा दोनदा करा.

## आजारांपासून दूर राहण्यासाठी खा शेंगदाणे



बहुतांश हेल्थ एक्सपर्ट्स असा सल्ला देतात की, नात्यात काहीतरी हेल्दी आणि टेस्टी खावे. जेणेकरुन दिवसभर शरीराला काम करण्यासाठी उर्जा मिळेल आणि पोट ही दीर्घकाळ भरलेले राहिल. बहुतांश लोक नाश्तात तळलेले पदार्थ खातात. मात्र काही लोक सकाळच्या नाश्त्यात हेल्दी आहाराची निवड करतात. यासाठी मोड आलेले चणे, मूग, दूध-ब्रेड खातात. मात्र तुम्ही दिवसाची सुरुवात मोड आलेली कडधान्ये अथवा पौष्टिक गोष्टींचे सेवन करत असाल तर आरोग्याला याचा मोठा फायदा होतो.

अशातच शेंगदाणे खाण्याचा नक्की काय फायदा होतो हे पाहूयात. तसेच त्यांचा कोणत्या प्रकारच्या नाश्त्यात समावेश केल्याने अधिक फायदा होतो हे सुद्धा पाहूयात. शेंगदाणे आपण बहुतांशवेळा उपवासावेळी खातो. परंतु तुम्ही कधी भिजवलेले शेंगदाणे खाल्ले आहेत का? याचे फायदे काय होतात हे आपण पाहूयात.

**पचनक्रिया उत्तम होते**

आपल्या सर्वांना माहिती आहे की, शेंगदाण्यात भरपूर प्रमाणात फायबर असते. हे एक फायबर फूड आणि फायबर फूड डाइजेशनसाठी उत्तम मानले जातात. यासाठी तुम्ही सुक्या शेंगदाण्याऐवजी भिजवलेले शेंगदाणे खा. जेणेकरुन पचनक्रिया सुधारली जाते.

**मेंदू आणि डोळ्यांसाठी उत्तम**

भिजवलेले शेंगदाणे नाश्त्यात खाल्ल्याने तुमची बुद्धि तल्लक होते. त्याचसोबत स्मरणशक्ती वाढली जाते. या व्यतिरिक्त तुम्ही पाहिले असेल की, जर तुम्हाला डोळ्यांना दिसण्यास समस्या येत असेल तर भिजवलेले शेंगदाणे खा.

**स्किनसाठी फायदेशीर**

भिजलेल्या शेंगदाण्याचे सेवन केल्याने तुमच्या स्किनची चमक वाढली जाते. जर तुम्हाला चेहऱ्यावर पिंपल्सची समस्या असेल तर याचे दररोज सेवन करा. काही दिवसातच तुम्हाला स्किनमध्ये फरक दिसून येईल. तुम्ही भिजवलेल्या शेंगदाण्यासह दोन बदाम आणि मूग डाळ भिजवू शकता.

## ओव्याच्या पाण्याचे आश्चर्यकारक आरोग्यवर्धक फायदे जाणून घ्या



ओवा हा एक मसाला आहे जो प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात नेहमीच असतो. साधारणपणे आपण विविध प्रकारच्या भाज्या बनवताना त्याचा वापर करतो. इतकेच नाही तर अनेक प्रकारच्या आजारांवर घरगुती उपाय म्हणूनही याचा वापर केला जातो.पोटाच्या समस्या दूर करण्यासाठी ओवा रामबाण उपाय म्हणून काम करते.ओव्याच्या पाण्याच्या सेवनाचे आरोग्यवर्धक फायदे जाणून घ्या.

गॅस समस्या सोडवा- गॅसची समस्या कमी करण्यासाठी ओव्याचे पाणी सेवन केले जाऊ शकते. ओव्याचे पाणी नियमितपणे प्यायल्यास पोटात गॅस तयार होणे कमी होते. इतकंच नाही तर पचनसंस्थेवरही याचा सकारात्मक परिणाम होतो. जे अन्न पचण्यास मदत करते.

पोटदुखीपासून आराम मिळतो-पोटदुखीची समस्या दूर करण्यासाठी ओव्याचे पाणी देखील खूप उपयुक्त आहे. विशेषतः, मासिक पाळीच्या दरम्यान वेदना आणि पेटके कमी करण्यासाठी कोरफड जेल चे पाणी प्यावे. ज्या स्त्रिया ओव्याचे पाणी पितात त्यांनाही मासिक पाळी नियमित करण्यात खूप मदत होते.

ॲसिडिटीपासून आराम मिळतो- ओव्याचे पाणी ॲसिडिटीची समस्या दूर करण्यातही खूप मदत करते. विशेषत: हे पाणी आले आणि जिरे सोबत घेतल्यास त्याचे परिणाम फार कमी वेळात दिसून येतात.

संसर्ग टाळण्यासाठी उपयुक्त -ओव्या मध्ये अँटीसेप्टिक, अँटी-मायक्रोबियल आणि अँटीपॅरासाइटिक गुणधर्म आहेत, जे खोकला, सर्दी, कान किंवा तोंडाच्या संसर्गास कारणीभूत असलेल्या जीवाणूंवर उतारा म्हणून काम करतात. त्यामुळे सेलेरीचे पाणी घेऊन स्वतःला अधिक निरोगी बनवू शकता.

वजन राखण्यासाठी उपयुक्त- ओव्याचे पाणी वजन नियंत्रित ठेवण्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकते. वास्तविक, जेव्हा ते सेवन करता तेव्हा ते चयापचय वाढवण्यास मदत करते. त्यामुळे वजन राखणे खूप सोपे होते.

## मद्यपान न करणाऱ्यांनाही होतो का फॅटी लिव्हरचा त्रास? हे आहे कारण




फॅटी लिव्हर ज्याला वैद्यकीय शास्त्राच्या भाषेत हेपॅटिक स्टीटोसिस म्हणतात. जे यकृत शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्याचे काम करते, त्यामुळे फॅटी लिव्हरच्या समस्येकडे वेळीच लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा ते अत्यंत गंभीर स्थितीत पोहोचू शकते आणि प्राणघातक देखील होऊ शकते. फॅटी लिव्हरची अनेक प्रकरणे गेल्या काही वर्षांत पाहण्यात आली आहेत. बहुतेकदा असे मानले जाते की फॅटी लिव्हर रोग फक्त अशा लोकांमध्ये होतो, जे अल्कोहोलचे सेवन करतात, तथापि जे लोक अल्कोहोल पीत नाहीत, त्यांना देखील फॅटी लिव्हरचा त्रास होऊ शकतो. वास्तविक, खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी हे फॅटी लिव्हरचे प्रमुख कारण आहे.

फॅटी लिव्हरचे दोन प्रकार आहेत, अल्कोहोलिक आणि नॉन-अल्कोहोलिक. जर आपण अल्कोहोलिक फॅटी लिव्हरबद्दल बोललो तर, अल्कोहोलच्या जास्त सेवनाने यकृताला सूज येते. त्याचबरोबर नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हरच्या समस्येमागे खाण्याच्या चुकीच्या सवयी असू शकतात.

यकृतामध्ये थोड्या प्रमाणात चरबी आधीपासूनच असते, परंतु जेव्हा शरीरातील कॅलरीजचे प्रमाण वाढते आणि त्याचे चरबीमध्ये रूपांतर होते आणि यकृताच्या पेशींवर जमा होऊ लागते तेव्हा या स्थितीला फॅटी लिव्हर म्हणतात. त्यामुळे यकृताच्या कार्यावर विपरीत परिणाम होतो आणि पचनक्रियाही बिघडू लागते.

ट्रायग्लिसराइड एक प्रकारची चरबी आहे, जी रक्तामध्ये असते आणि आपले शरीर या चरबीचा वापर करते आणि त्याचे उर्जेमध्ये रूपांतर करते, परंतु त्याच्या अतिरेकामुळे अनेक समस्या उद्भवतात. यापैकी एक आरोग्य समस्या म्हणजे फॅटी लिव्हर. व्हाईट ब्रेड, झटपट जंक फूड, कुकीज, लाल मांस, तळलेले अन्न यांसारखे काही पदार्थ तुमच्या शरीरातील ट्रायग्लिसराइड्सचे प्रमाण वाढवू शकतात, कारण त्यात सॅच्युरेटेड फॅट असते ज्यामुळे ट्रायग्लिसराइड्स वाढतात.

शरीरातील रक्तातील ट्रायग्लिसराइड्स फॅट वाढल्यामुळे फॅटी लिव्हरची समस्या उद्भवू शकते. यासोबतच फॅटी लिव्हरची समस्या जास्त वजन आणि मधुमेहाने त्रस्त असलेल्या लोकांमध्ये दिसून येते.

फॅटी लिव्हरच्या समस्येच्या बाबतीत, थकल्यासारखे वाटणे, यकृताच्या भागात त्वचेवर सूज येणे, जडपणा जाणवणे, वारंवार उलट्या झाल्यासारखे वाटणे, खराब पचन, भूक न लागणे, वजन वाढणे किंवा झपाट्याने वजन कमी होणे यांसारखी लक्षणे दिसतात. याशिवाय काही वेळा विचार करण्याची आणि समजून घेण्याच्या क्षमतेवरही परिणाम होऊ शकतो.

संतुलित आहार घेतल्यास आणि अल्कोहोलपासून दूर राहून फॅटी लिव्हरची समस्या टाळता येते. ज्या लोकांना ही समस्या आहे, त्यांनी तळलेले आणि जंक फूड तसेच जास्त मीठ आणि जास्त साखर असलेल्या गोष्टींपासून दूर राहावे. याशिवाय तुमचे वजन नियंत्रणात ठेवा. यासाठी दैनंदिन व्यायाम किंवा चालणे, सायकल चालवणे यासारख्या हलक्या हालचालींचा आपल्या दैनंदिन दिनक्रमात समावेश करा.

## जास्त लोणचं खाण्याची सवय पडू शकते महाग





लोणचं हा शब्द ऐकताच तोंडाला पाणी सुटू लागते. तसेच लोणची ही अनेक प्रकारची असतात. अशातच लोणचे जास्त खाण्याची सवय देखील तुम्हाला आजारी बनवू शकते. लोणच्याचे शेल्फ लाइफ वाढवण्यासाठी त्यात मोठ्या प्रमाणात मीठ आणि तेल टाकले जाते. यामुळे उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्टेरॉल आणि हाडे ढिसूळ होऊ शकतात.

अनेकदा आपण जेवणाची चव वाढवण्यासाठी लोणच्याचा तुकडा ताटात घालतो. तसेच आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. लोणचे खाल्ल्याने आपल्या शरीराला फायदा होतो. पण तुम्हाला माहित आहे का की लोणचे जास्त खाण्याची सवय तुम्हाला आजारी देखील बनवू शकते. तर आता आपण जास्त लोणचे खाल्याने कोणते दुष्परिणाम होतात हे जाणून घेऊया..

**शरीरातील पोषक द्रव्ये कमी होतात**

लोणचे बनवण्यासाठी वापरल्या जाणार्या प्रक्रियेमुळे त्याचे पौष्टिक मूल्य कमी होते.
तसेच हे लोणचे बनवण्यासाठी फळे किंवा भाज्या कापून उन्हात वाळवण्यासाठी ठेवल्या जातात.
फळे किंवा भाज्यांमध्ये पाणी राहू दिले जात नाही. तसेच सूर्यप्रकाशात फळे कोरडी केल्यामुळे बहुतेक पोषक तत्वांचा नाश होतो.
लोणची वाळवण्यासाठी त्याच्या प्रक्रियेत त्यांच्यावर मीठाचा लेप लावला जातो.
लोणच्यात असलेल्या सोडियममुळे रक्तदाब वाढतो
लोणचे किंवा लोणच्यासारख्या इतर अनेक खारट पदार्थांमध्ये असलेले सोडियम यामुळे रक्तदाब वाढतो.
तसेच कमी प्रमाणात लोणचे खाल्ल्याने एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होऊ शकत नाही.
पण अतिरिक्त सोडियम क्लोराईड खाण्याच्या नियमित सवयीमुळे उच्च रक्तदाब आणि इतर अनेक आजार देखील होऊ शकतात.

## Fish Oil की Krill Oil कोणते तेल आरोग्यासाठी फायदेशीर?

आरोग्य उत्तम राहण्यासाठी आपण काही प्रकारच्या फूड्सची गरज असते. त्यापैकीच एक म्हणजे फिश ऑइल. जे साल्मन आणि मॅकेरल सारख्या फॅटी फिशमधून मिळते. हे जगभरातील एक पॉपुलस डाएटरी सप्लिमेंटच्या रुपात वापरले जाते. माशाच्या तेलात ओमेगा-३ फॅटी ॲसिड सारखे पोषक तत्त्वे असतात. आजकाल क्रिल ऑइलचा सुद्धा वापर वाढला गेला आहे.

**क्रिल ऑइल म्हणजे नक्की काय?**

क्रिल ऑइल अंटार्कटिक क्रिल नावाच्या एका लहान क्रस्टेशियंस पासून काढले जाते. या समुद्रातील जीवाला व्हेल, सील, पेंगव्हिन आणि अन्य पक्षी खातात. फिश ऑइल प्रमाणेच क्रिल ऑइलमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते. मात्र दोघांचा परिणाम आपल्या शरीरावर वेगवेगळ्या प्रकारे होऊ शकतो. अशातच कोणते तेल आरोग्यासाठी उत्तम आहे हे जाणून घेऊयात.



फिश ऑइलमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असते. जे हृदयाच्या आरोग्यासाठी गरजेचे असते. २०१७ मधील एका अध्ययनानुसार असे समोर आले आहे की, हे एथेरोस्क्लेरोसिस किंवा धमन्या कठोर होण्यापासून रोखण्यास मदत करते. तर अमेरिकन हार्ट एसोसिएशनच्या जर्नलमधील २०१३ च्या एका अभ्यासात असे समोर आले आहे की, रक्तातील डीएचए/ईपीएचा उच्च स्तर हार्ट अटॅकची रिस्क कमी करण्यास मदत करते.

तर २०१५ मध्ये झालेल्या एका अभ्यासानुसार क्रिल ऑइलमुळे टाइप-२ मधुमेह असलेल्या रुग्णांना हृदयासंबंधित जोखिम, विशेष रुपात एंडोथेलियल डिसफंक्शन आणि एचडीएलमध्ये मध्यम सुधार होऊ शकते. मात्र ज्यांना मधुमेह नाही त्यांना सुद्धा फायदा होऊ शकतो. या व्यतिरिक्त क्रिल ऑइल हे ब्रेनमध्ये ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस आणि बीटा एमिलॉइडला जमा कमी करण्यास मदत करते. जे अल्जाइमर रोगाचे कारण मानले जाते. मात्र अद्याप या बद्दल अधिक रिसर्च सुरु आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने स्वच्छता जनजागरण रॅली

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२ ऑक्टोबर २०२३ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'स्वच्छता जनजागरण रॅली ' काढण्यात आली आणि महाविद्यालय व दयानंद शिक्षण संस्थेच्या परिसरातही स्वच्छता करण्यात आली.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. राहुल जाधव व डॉ.सुरज कोल्हे, राष्ट्रीय छात्र सेना कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, डॉ.महादेव पंडगे, ग्रीन क्लब महाविद्यालय समन्वयक डॉ.अमोल ठोसर,विद्यार्थी प्रतिनिधी अनंत शिरोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांनी पाण्याचा वापर काळजीपूर्वक करावा-आ. देशमुख

लातूर : गेल्या काही दिवसांत झालेल्या परतीच्या पावसामुळे मांजरा नदीवरील काही बराज तुडूंब भरले आहेत. पुढचे काही दिवस पाऊस असाच राहिला तर उर्वरित बराजही भरतील, अशी आशा आहे. पण, या पाण्याचा सर्वांनी अत्यंत काळजीपूर्वक व काटकसरीने वापर करावा, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आ. धिरज देशमुख यांनी मंगळवारी येथे केले. पावसाळ्याच्या गेल्या चार महिन्याच्या कालावधीत आपल्याकडे पुरेसा पाऊस झाला नाही. लातूरकरांची जीवनवाहिनी असलेल्या मांजरा धरण क्षेत्रातही पावसाने यंदा पाठ फिरवली आहे. त्यामुळे धरणात सध्या पुरेसा पाणी साठा नाही. परतीच्या पावसामुळे या आठवडाभरात धरणातील साठा ३० टक्क्यांपर्यंत पोचला आहे. पण, धरण यंदा पूर्ण क्षमतेने भरेल, ही आशा धूसर बनली आहे. परतीचा पाऊस सध्या अंतिम टप्प्यात पोचला आहे. हवामान विभागाच्या सध्याच्या अंदाजानुसार आता मुसळधार पावसाची शक्यता कमी आहे. पण, मांजरा नदीवरील उर्वरित बराज भरतील, असे संकेत मिळत आहेत. या पाण्याचा सर्वांना अतिशय काटकसरीने, नियोजनबद्ध वापर करावा लागणार आहे, याकडे आ. धिरज देशमुख यांनी लक्ष वेधले.

# ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी तळमळीने काम-नितीन शेटे

लातूर : ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत तळमळीने काम करत असल्याचे मत अर्थभारती नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष नितीन शेटे यांनी व्यक्त केले.

गांधी जयंतीचे औचित्य साधून अखिल भारतीय ग्राहक पंचायतला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने २०२३ - २४ हे वर्ष सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष म्हणून साजरे करण्यासाठी आयोजित कार्यक्रमाचे शेटे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी ते बोलत होते.समारंभाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रांताचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाचे माजी सदस्य संपतराव झळके तर प्रमुख वक्ते म्हणून ग्राहक तक्रार निवारण मंच,पुणेचे अध्यक्ष अजय भोसरीकर यांच्यासह व्यासपीठावर अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील आणि सुवर्ण महोत्सवी वर्षाचे जिल्हा संयोजक अँड.संगमेश्र्वर रासुरे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा गांधी आणि युगपुरुष स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेचे पूजन करून झाले. कार्यक्रमाची सुरुवात उषा वाघमारे यांनी ग्राहक गीत गाऊन केली.जिल्हा उपाध्यक्ष बळवंतराव कागले यांचा सत्कार झळके यांनी तर सुरेखा स्वामी यांचा सत्कार भोसरीकर यांनी केला. दीपक पाटील,संजय पाटील आणि सतीश जाधव यांचा सत्कार मान्यवरांनी केला.उषा वाघमारे यांचा सत्कार अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या महिला जिल्हाध्यक्षा मंजुश्री ढेपे यांनी केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन माधव गुंडरे व प्रास्ताविक दत्तात्रय पाटील यांनी केले.

संपूर्ण देशात सुवर्ण जयंती महोत्सवास शुभारंभ होत आहे.ग्राहक पंचायत,नवीन ग्राहक संरक्षण कायदा व ग्राहक जागृती हे तीन विषय घेऊन कार्यक्रमाचे वाडी,

वस्ती,गाव व तालुका या ठिकाणी सादरीकरण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.उद्घाटक नितीन शेटे यांनी जिल्हाभरातून उपस्थित अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.सुवर्ण जयंती महोत्सवासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.ग्राहक मंचचे अध्यक्ष भोसरीकर यांनी ग्राहकांचे हक्क आणि कर्तव्य,ग्राहक चळवळ,ग्राहकांना न्याय देण्यासाठी तीन स्तरीय प्रणाली,जिल्हा ग्राहक आयोग,राज्य ग्राहक आयोग आणि राष्ट्रीय ग्राहक आयोग याबाबत मार्गदर्शन केले.नवीन ग्राहक संरक्षण कायद्याची व्याप्ती उदाहरणे देऊन विषद केली आणि ग्राहक कार्यकर्त्यांनी कशाप्रकारे काम केले पाहिजे याची माहिती दिली.

सुवर्ण महोत्सवी वर्षाचे जिल्हा संयोजक संगमेश्र्वर रासुरे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आणि ग्राहक जागृती याबाबत मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात झळके यांनी ईश्र्वराने तुम्हा सर्व कार्यकर्त्यांना ग्राहक हिताचे काम करण्यासाठी संधी दिली आहे ती निष्ठेने पार पाडावी.अडचण आल्यास प्रांत कार्यकारिणी सदैव पाठीशी आहे असे मत व्यक्त केले.वर्षभराच्या कार्यक्रमाची आखणी करून सुवर्ण जयंती महोत्सवी वर्ष यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

या कार्यक्रमास तालुकास्तरीय अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करयासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत लातूर तालुका कार्यकारिणीचे धनराज जाधव,तालुका अध्यक्ष इस्माईल शेख,जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाटील,महिला कार्यकारिणीच्या जिल्हाध्यक्षा मंजुश्री ढेपे,

जिल्हा संघटक सौ. सारिका मसळकर , जिल्हा कार्यकारिणीचे किशन वडारे,दिलीप पाटील, बळवंत कागले रेणापूर तालुका अध्यक्ष महादेव बांडे, शहराध्यक्ष नंदकुमार वलमपल्ले, महिला कार्यकारिणीच्या अध्यक्षा अश्र्विनी बने, चाकुर तालुकाध्यक्षा शकुंतला शेवाळे,लातूर महिला कार्यकारिणी अध्यक्षा उषा वाघमारे , शिरूर अनंतपाळ महिला कार्यकारिणी अध्यक्षा संगीता काथवटे,जिल्हा संयोजक अँड.रासुरे व सौ.रासुरे यांनी परिश्रम घेतले.उपस्थितांचे आभार माधव गुंडरे यांनी मानले.

# सोयाबीनवर रोगाचा प्रादुर्भाव तातडीने पंचनामे करण्याचे राज्य शासनाचे निर्देश; शेतकऱ्यांना दिलासा-आ. कराड

लातूर : लातूरसह राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये सोयाबीनच्या पिकावर पिवळा मोझेक हा विषाणूजन्य रोग आणि खोडकूज, मूळकूज या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून कृषी विभाग आणि मदत व पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे तातडीने सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करावे, असे निर्देश राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीत दिल्याने नुकसानीत आलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

पावसाचा मोठा खंड आणि सप्टेंबरमध्ये झालेला पाऊस, तापमानात बदल तसेच इतर काही कारणांमुळे चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, सोलापूर, लातूर, वाशिम, नांदेड या जिल्ह्यांत सोयाबीनवर रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. सोयाबीनचे पीक पिवळे पडत चालले आहे असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले



की, नुकसान झालेल्या क्षेत्रामध्ये विमा संरक्षित क्षेत्राचा अंतर्भाव असल्यामुळे विम्याची मदत वेळेत करणे शक्य व्हावे आणि त्यांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळावा म्हणून प्राधान्याने हे पंचनामे करावेत, असे निर्देश राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिले. या निर्णयामुळे नुकसानीत आलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून राज्यातील महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

## महावितरणच्या वतीने परिसर स्वच्छता करून महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्रींना अभिवादन



लातूर : अख्या विश्वाला सत्य, अहिंसा आणि सहिष्णूता यांची शिकवण देणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी तमेच जय जवान जय किसानचा नारा देणारे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महावितरणच्या शाखा क्रमांक-३च्या वतीने परिसर स्वच्छता मोहिम राबवून अभिवादन कण्यात आले.

स्वच्छता ही सेवा या मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हाकेला प्रतिसाद देत महावितरणच्या वतीने परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महात्मा गांधी तसेच माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून लातूर परिमंडळातील शाखा क्रमांक-३ अंतर्गत येणाऱ्या ३३ केव्ही आर्वी उपकेंद्रातील वाढलेली झाडे झुडपे काढून टाकून परिसर स्वच्छ करण्यात आला. शाखा क्रमांक -३ चे सहाय्यक अभियंता श्री राहूल गाडे यांच्या पुढाकारातून ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेत कर्यालयातील कर्मचारी सर्वश्री राऊत, विनोद मुंडे, सुरेश मुंडे, यादव,गायकवाड, मृगजळे,कोळी, मोतीपल्ले, कांबळे, मारोती मुंडे व सय्यद यांनी परिश्रम घेतले.

## श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयात स्वातंत्र्य चळवळीचे पोस्टर्स प्रदर्शन

लातूर : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून येथील श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयात इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ.बाळू कांबळे, प्रा.डॉ. विजयकुमार मेकेवाड व इतिहास अभ्यास मंडळातील विद्यार्थी प्रतिनिधी यांनी प्रा. डॉ.सुनील पुरी संकलित केलेल्या विविध पोस्टर्स प्रदर्शनाचे आयोजन केले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळ व हैदराबाद मुक्तिसंग्राम आंदोलनातील स्वातंत्र्य सेनानींनी दिलेल्या योगदानाचे,बलिदानाचे माहिती महाविद्यालयातील युवकांना करून देण्याच्या भूमिकेतून भव्य अशा पोस्टर्स प्रदर्शनाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय पाटील यांनी केले.यावेळी इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बाळू कांबळे यांनी स्वातंत्र्य चळवळीचा चैतन्य इतिहास व स्वातंत्र्य वीरांच्या जीवन कार्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगून आपण आपला इतिहास सतत स्मरणात ठेवला पाहिजे. आपणास मिळालेले स्वातंत्र्य हे आपल्या देशातील नेत्यांनी दिलेल्या त्यागातून व बलिदानातून मिळाले असून,स्वातंत्र्य मिळाले म्हणून सर्वात मोठ्या लोकशाही स्वातंत्र्य असलेल्या देशात आपण राहतो व लोकशाहीचा हक्क बजावतो. पण आपण आपले स्वातंत्र्य कोणतेही किंमत देऊन टिकवून ठेवले पाहिजे. आपले स्वातंत्र्य हरवले तर लोकशाहीला धोका निर्माण होईल असे विचार प्रा. डॉ. बाळू कांबळे यांनी प्रतिपादन केले.

प्रारंभी प्रास्ताविक विचार प्रा. विजयकुमार मेकेवाड यांनी मांडले. तर अध्यक्षीय समारोपाचे यथोचित भाषण करतांना इतिहासाचे वाचन, मनन व चिंतन युवकांनी करावे. असे मत प्राचार्य डॉ.अजय पाटील यांनी व्यक्त करून, ग्रंथालयातील ग्रंथाचा उपयोग विद्यार्थ्यांनी अधिकात अधिक करून आपले वाचन वाढवावे,व्यासंग जपावा, मोबाईलचा योग्य वापर करावा, योग प्राणायाम व व्यायाम करून आपले स्वास्थ्य सदृढ आरोग्य सांभाळावे. या संदर्भात मौलिक माहिती दिली.या समारंभाचे सूत्रसंचालन कु. ऐश्र्वर्या सूर्यवंशी यांनी केले.

तर आभार इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष कु. शबनम शेख यांनी मांडले. या एक दिवसीय पोस्टर प्रदर्शनास परिसरातील नागरिक व विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. शंकर येडले, प्रा. चव्हाण शंकर, प्रा.सौ.अनीता गायकवाड, प्रा. डॉ. बनसोडे कुमार,प्रा. डॉ. दत्तात्रय खरटमोल, प्रा. देशमुख जी.एस., कु. श्रावणी काळे, बुद्धभूषण बनसोडे, सोहेल पठाण आदींनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीत अध्यापन पद्धत महत्त्वाची -डॉ. सुकाळे

लातूर : आपल्या देशामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची सुरुवात सन २०२०ला झाली आहे. या धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीत अध्यापन पद्धत महत्त्वाची आहे असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील मानव्य विद्याशाखा संकुलाचे अधिष्ठाता डॉ. विकास सुकाळे यांनी केले

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय (आय.क्यू.ए.सी. आणि भूगोल विभाग), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने भूगोल विषयाची विद्यापीठस्तरीय एक दिवसीय कार्यशाळा महाविद्यालयातील व्होकेशनल सभागृहात आयोजित करण्यात आली होती यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.



या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे संचालक अँड. श्रीकांतप्पा उटगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. आप्पाराव काळगापुरे, अर्थ सायन्स संकुलाचे संचालक डॉ. अविनाश कदम, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रो. डॉ. आनंद शेवाळे, भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समितीचे समन्वयक प्रो. डॉ. दीपक चाटे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहराने अभिवादन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर संगीत विभागातील प्रा. विश्र्वनाथ स्वामी, प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. गोविंद पवार आणि विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले.

पुढे बोलताना डॉ. सुकाळे म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून आपल्या विद्यापीठाने भूगोल विषयाचा अभ्यासक्रम तयार केला आहे. या अभ्यासक्रमाची रचना, अध्ययन पद्धती, विषयाची माहिती आणि अभ्यासक्रमाची यशस्वी अंमलबजावणी याविषयी माहिती देऊन त्यांनी अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांना समजेल अशा पद्धतीने समजून सांगण्याची जबाबदारी ही प्रत्येक महाविद्यालयातील शिक्षकांची आहे असे त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना डॉ. बाळासाहेब गोडबोले म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारा भूगोल विषयाची राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्याची परवानगी आमच्या महाविद्यालयाला दिली त्यामुळे भूगोल विषय विषयाची शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अंमलबजावणी करणे आपल्याला सुलभ जाईल असे सांगून दिवसभरातील सर्व सत्राला आपण उपस्थित राहून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि आपला अभ्यासक्रम जाणीवपूर्वक समजून घ्यावा असे ते म्हणाले.

या कार्यशाळेत स्वागतपर मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रित असून भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमातून समाजाच्या सद्यस्थितीतील गरजांची पूर्तता झाली पाहिजे तेव्हाच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे समाजाभिमुख होईल असे ते म्हणाले. यावेळी डॉ. अप्पाराव काळगापुरे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचा अध्यक्ष समारोप करताना अँड. श्रीकांतप्पा उटगे म्हणाले की, आज आमच्या महाविद्यालयामध्ये भूगोल विषयाची विद्यापीठस्तरीय एक दिवसीय कार्यशाळा संपन्न होत आहे याबद्दल विद्यापीठाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण खऱ्या अर्थाने यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी संस्था पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, शाखा समन्वयक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सक्रिय योगदान अत्यंत महत्त्वाचे असून भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमातून समाजाच्या पर्यावरणीय गरजांची पूर्तता झाली पाहिजे असे ते म्हणाले.

या कार्यशाळेमध्ये प्रा. बालाजी गुरुडे लिखित पर्यावरण: समस्या, जाणीवजागृती आणि संवर्धन या ग्रंथाचे विमोचनही करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर आभार डॉ. शिवप्रसाद धरणे यांनी मानले. या कार्यशाळेसाठी नांदेड विद्यापीठातील हिंगोली, परभणी, नांदेड आणि लातूर जिल्ह्यातील भूगोल विषयातील बहुसंख्य अभ्यासक, संशोधक विद्यार्थी, प्राचार्य, शिक्षक बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेला उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, प्रा. एन. बी. रेड्डी, प्रा. नारायणकर यांचीही उपस्थिती होती. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. अभय धाराशिवे, डॉ. शिवकुमार इजारे, डॉ. संगम धाराशिवे, डॉ. टि. एन. महाजन, डॉ. कुंदन लोखंडे, सय्यद जलील, अशोक शिंदे, रघु शिंदे, संतोष येचवाड, रंगनाथ लांडगे, कृष्णा कोळी, भीमाशंकर सुगरे आणि भूगोल विभागातील संशोधक विद्यार्थी आणि विद्यार्थी विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

# श्री रेणुका देवी भक्तनिवास बांधकामाची आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून पाहणी



लातूर : असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर येथील श्री रेणुका देवी मंदिर परिसरात भाविक भक्तांच्या सोयीसाठी बांधण्यात येत असलेल्या एक कोटी रुपये खर्चाच्या भक्तनिवास बांधकामाची भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी रविवारी पाहणी करून अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

आदिशक्ती श्री रेणुका देवीच्या दर्शनासाठी जिल्ह्यातील अथवा मराठवाड्यातीलच नव्हे तर राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने येतात. भाविकांची राहण्याची सोय व्हावी याकरिता रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांनी भक्तनिवास बांधकाम व्हावे यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडे आग्रह केला होता. त्यानुसार आ. रमेशअप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे यांच्याकडे नगर विकास विभागाअंतर्गत निधी मिळावा यासाठी सतत पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे श्रीरेणुका देवी मंदिर परिसरात भक्तनिवास बांधकामाकरिता एक कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला. सदरील निधीतून नियोजित भक्तनिवास बांधकाम करण्यात येत आहे या बांधकामाची आ. रमेशअप्पा कराड यांनी रविवारी दुपारी पाहणी करून समाधान व्यक्त केले त्याचबरोबर अनेक महत्वपूर्ण सूचना केल्या.

प्रारंभी आ. रमेशअप्पा कराड यांनी आदिशक्ती श्री रेणुका मातेचे आरती करून भक्तीभावे दर्शन घेतले. भक्तनिवास बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मंदिर ट्रस्टच्या वतीने आ. कराड यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले. यावेळी तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड, रेणापूर ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ अनिता अलगुले, पसचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महिंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, माजी नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, अनिल भिसे, सतीश आंबेकर, दत्ता सरवदे, श्रीकृष्ण जाधव, विजय गंभीरे, सचिन चेवले, चंद्रकांत कातळे, श्रीकृष्ण पवार, भागवत गीते, गोपाळ शेंडगे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राम पाटील, उटगे गुरुजी, अँड प्रशांत आकनगिरे, दिलीप आकनगिरे त्याचबरोबर सचिन सिरसकर, अमर चव्हाण, शिवमुर्ती उरगुडे, शिला आचार्य, माधव गुडे, उत्तम चव्हाण, संतोष चव्हाण, उज्वल कांबळे, अच्युत कातळे, राजू आलापुरे, अंतराम चव्हाण, शेख अजीम, रमा चव्हाण, राजू आत्तार, लखन आवळे, हनुमंत भालेराव, दिलीप चव्हाण, संतोष राठोड, गणेश माळेगावकर पप्पू कुडके यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी कार्यकर्ते अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरुपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते